# कार्यकारी सारांश

## रेती उत्खननाच्या पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडयाचा मसुदा

## जिल्हा – नागपुर, महाराष्ट राज्य

## नागपुर जिल्हयातील प्रस्तावित 22 रेती घाटांच्या पर्यावरणीय जनसुनावणीकरिता

प्रकल्प प्रवर्तक

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर

पर्यावरण सल्लागार

**Open Arch Design and Enviro Solutions LLP**

**NABET/EIA/2124/IA0081**

**openarchdesign@gmail.com**

**Contact no. :9004778386**

# १ प्रस्तावना

मा. जिल्हाधिकारी, नागपुर यांनी रेती/वाळू निर्गमीतीचे धोरण दि.१९.०४.२०२३ अनुसार २२ रेती घाट उत्खननासाठी प्रस्तावित केलेले असून जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपुर यांना विविध अनुमती घेणेकरिता प्रकल्प प्रवर्तक म्हणून नेमलेले आहे.

सदर २२ रेतीघाट तालुका स्तरावर मा. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या व भुवैद्यन्यानिक, म. प्र.नि.म. यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिाक समिती द्वारे ओपन कास्ट पध्दतीने घमेले, पावडे यांच्या साहारूयाने उत्खनन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

पर्यावरण अनुमतीसाठी प्रस्तावित २२ रेती घाटांची यादी खालील प्रमाणे आहे.

# Table 1.0 Details of Sand Ghats

| Sr No | Name of Village | Taluka | Nearest Gut. No. | Name of River/ Stream | Dimension of sand Gat in Cum | | | Area of Sand Ghat in Ha | Sand Proposed for scoping in Brass | Width of approch road | Length of approach Road | No. of workers | No. of Tractors | No. of trees along bank & transportation road | Water requirement in cum/ day | EMP cost in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | L | W | D | | | | | | | | | |
| 1. | Mouda (Chikna Ghat) | Mauda | Juna S.No. 542,541 and 543 part | Kanhan | 590 | 65 | 0.90 | 3.83 | 12196 | 3-6 m | 780 m | 15 | 5 | 750 | 2.5 | ₹ 3,34,860 |
| 2. | Mohkhedi | Mauda | S.No. 116, 117, 118 part | Kanhan | 490 | 100 | 0.90 | 4.9 | 15583 | 3-6 m | 141 m | 15 | 5 | 352 | 3 | ₹ 8,31,060 |
| 3. | Mahalgaon-A | Mauda | S.No. 261 part Pimpalgaon, 23 part, 24, 25, 26 part | Sur | 380 | 60 | 0.40 | 2.28 | 4028 | 3-6 m | 444 m | 15 | 5 | 620 | 3 | ₹ 1,20,840 |
| 4. | Mahalgaon-B | Mauda | S.No. 373, 368, 387 adjacent part | Sur | 275 | 70 | 0.40 | 1.92 | 3401 | 3-6 m | 171 m | 15 | 5 | 285 | 3 | ₹ 2,04,060 |
| 5. | Dahadi | Mauda | S.No. 107 part, 108, 120, 110, 111 | Kanhan | 350 | 30 | 0.50 | 1.05 | 1855 | 3-6 m | 382 m | 15 | 5 | 441 | 3 | ₹ 55,690 |
| 6. | Yesamba | Parseoni | S.No. 207 part | Pench | 302 | 35 | 0.80 | 1.057 | 2987 | 3-6 m | 168 m | 15 | 5 | 384 | 2.5 | ₹ 2,04,040 |
| 7. | Juni Kamptee (Gadeghat) | Parseoni | S.No. 230 part 241/2 part | Kanhan | 400 | 90 | 0.90 | 3.60 | 11448 | 3-6 m | 131 m | 15 | 5 | 365 | 2.5 | ₹ 3,39,190 |
| 8. | Palora | Parseoni | S.No. 102 part, 99, 43 part | Pench | 400 | 60 | 1.30 | 2.40 | 11024 | 3-6 m | 949 m | 15 | 5 | 725 | 2.5 | ₹ 2,54,400 |
| 9. | Singardip | Parseoni | S.No. part 81/1, 81/2, 82 | Kanhan | 460 | 75 | 0.90 | 3.45 | 10971 | 3-6 m | 118 m | 15 | 5 | 309 | 2.5 | ₹ 5,24,700 |
| 10. | Pipla | Parseoni | S.No. 353 part, 354 part | Pench | 255 | 95 | 1.50 | 2.42 | 12840 | 3-6 m | 201 m | 15 | 5 | 400 | 2.5 | ₹ 3,69,180 |
| 11. | Waghoda | Parseoni | S.No. 127 part | Pench | 410 | 120 | 1.5 | 4.92 | 26077 | 3-6 m | 405 m | 15 | 5 | 325 | 2.5 | ₹ 10,43,100 |

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | 0 | | | | | | | | | |
| 12. | Saholi-B | Parseoni | S.No. 104 part,108/2, 109/2, 110/2, 112/3, 113/2, 115/2, 116/2 part | Kanhan | 500 | 50 | 0.8 | 2.50 | 7067 | 3-6 m | 282 m | 15 | 5 | 540 | 2.5 | ₹ 1,37,340 |
| 13. | Nayakund | Parseoni | 34-part, 33 | Pench | 360 | 45 | 0.60 | 1.62 | 3434 | 3-6 m | 76.5 m | 15 | 5 | 390 | 2.5 | ₹ 2,06,040 |
| 14. | Pardi K | Parseoni | 153, 146 part | Kanhan | 450 | 100 | 0.80 | 4.5 | 12720 | 3-6 m | 249 m | 15 | 5 | 425 | 2.5 | ₹ 8,58,600 |
| 15. | Saholi-A | Parseoni | S.No. 15 part, 16, 17, 18 | Kanhan | 400 | 40 | 0.60 | 1.60 | 3392 | 3-6 m | 259 m | 15 | 5 | 325 | 2.5 | ₹ 1,69,560 |
| 16. | Bina | Kamptee | 53 part, 56, 57/1, 57/2 part | Kanhan | 490 | 100 | 0.70 | 4.90 | 12120 | 3-6 m | 433 m | 15 | 5 | 810 | 2.5 | ₹ 10,38,840 |
| 17. | Neri | Kamptee | S.No. 217, 219, 220, 221, 223, 224 part | Kanhan | 565 | 86 | 1 | 4.85 | 17169 | 3-6 m | 438 m | 15 | 5 | 810 | 2.5 | ₹ 9,30,001 |
| 18. | Chikna-A | Kamptee | S.No 9, 10, 11 | Kanhan | 500 | 64 | 0.9 | 3.20 | 10176 | 3-6 m | 509 m | 15 | 5 | 550 | 2.5 | ₹ 4,22,000 |
| 19. | Gosewadi -A | Saoner | S.No. 285, 286, 287 part | Kanhan | 480 | 100 | 0.50 | 4.8 | 8480 | 3-6 m | 125 m | 15 | 5 | 325 | 2.5 | ₹ 8,14,080 |
| 20. | Khapapeth | Saoner | S.No. 284 Part | Kanhan | 500 | 75 | 0.50 | 3.75 | 6625 | 3-6 m | 163 m | 15 | 5 | 430 | 2.5 | ₹ 4,77,000 |
| 21. | Raiwadi | Saoner | S.No. 190 | Kanhan | 300 | 75 | 0.50 | 2.25 | 3975 | 3-6 m | 187 m | 15 | 5 | 540 | 2.5 | ₹ 3,81,600 |
| 22. | Tembhurdoh | Saoner | S.No. 279, 274 & old Gavthan Part | Kanhan | 300 | 60 | 0.50 | 1.8 | 3180 | 3-6 m | 214 m | 15 | 5 | 500 | 2.5 | ₹ 3,05,280 |

## २ रेतीघाटांसाठी प्राप्त आवश्यक अनुमती + परवानग्या व गोषवारा.

| | |
|---|---|
| प्रकल्प प्रवर्तक | जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपुर |
| प्रकल्प स्थिती | नवीन, प्रस्तावित रेतीघाट |
| उत्खनन करावयाचे खनिज | रेती वाळू |
| रेतीघाट प्रस्तावित करणारी समिती | मा. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या व भुवैद्यन्यानिक, म.प्र.नि.म. यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका स्तरीय तांत्रिक समिती |
| ग्रामपंचायत ना हरकत | ग्रामपंचायतींकडून वाळू निर्गमीतीच्या धोरणानुसार प्राप्त |
| उत्खननाकरिता ठरवून दिलेला कालावधी | सप्टेंबर पर्यंतचा मान्सून कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्ष. |

## ३ प्रस्तावित व उत्खनन पध्दत:

रेती उत्खनन टोपले, पावडे द्वारे मजुरांकडून करण्याचे प्रस्तावित आहे.

अ. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.

ब. रेती उत्खनन टोपले, पावडे द्वारे मजुरांकडून करण्याचे प्रस्तावित आहे.

क. उचललेली रेती ट्रॅक्टर द्वारे वाहण्याचे प्रस्तावित आहे.

ड. ट्रॅक्टर वगळता कोणतीही अवजड व तांत्रिक मशीनरी उपयोगात आणता येणार नाही.

इ. उत्खननाकरिता ठरवून दिलेला कालावधी हा दि. १० जून ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मान्सून कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्षाकरिता प्रस्तावित आहे.

# 4 पर्यावरण व्यवस्थापन योजना

| तपशील | व्यवस्थापन योजना |
|---|---|
| वायु पर्यावरण | ➢ धूळ उत्सर्जन रोखण्यासाठी १.०० कि मी लांबीच्या रस्त्यावर पाणी शिंपडले जाणार<br>➢ ट्रॅक्टरचा वेग मर्यादेत असेल<br>➢ रस्त्यांची देखभाल नियमित प्रमाणे केली जाणार<br>➢ वहन मार्गाचे मजबूती करणे<br>➢ रेती वाहन करणा—या ट्रक्टर टॉलीज टरपोलिन ने वहन दरम्यान झाकणे. ट्रक्टर<br>➢ ट्रक्टर मध्ये मान्य क्षमतेनुसार खनिज वहन |
| ध्वनि पर्यावरण | ➢ कामगारांना कान बुचे देण्याचे प्रस्तावित आहे.<br>➢ ट्रॅक्टर / ट्रक व्यतिरिक्त कोणत्याही ध्वनी प्रदूषण करणा—या मशीनरी प्रतिबंधीत असतील.<br>➢ ट्रॅक्टर चे इंजिने रेतीघाटावर रेती भरते वेळेस बंद ठेवण्यात येईल.<br>➢ कामगारांना व अभ्यंगताना वैयक्तिक संरक्षक उपकरणे देण्यात येईल. |
| जल पर्यावरण | ➢ पावसाळयात खाणकाम बंद असेल, यामुळे वाळूचा साठा पुन्हा भरून निघेल<br>➢ फिरते शौचालय कामगारांसाठी उपलब्ध असणार जेणेकरून सांडपाण्याची व्यवस्था होईल.<br>➢ घनकचरासाठी कचरापेटीची व्यवस्था असेल आणि त्याची स्थानिक पातळीवर विल्हेवाट लावण्यात येईल. |
| जमीन पर्यावरण | ➢ ३ मीटर किंवा नदीच्या रूंदीच्या १/१० वा यापैकी जे जास्त असेल ते सुरक्षित अंतर नदीच्या दोन्ही काठावरून सोडले जाईल (शाश्वत वाळू उत्खनन |

| | |
|---|---|
| | मार्गदर्शक तत्वांनुसार)<br>➢ खाणकाम ची खोली जास्तीत जास्त १.५ मी असेल नदीच्या काठा जवळ खाणकाम नाही होणार |
| जैविक पर्यावरण | प्रस्तावित रेती उत्खनन नदीच्या कोरडया पात्रात होणार असल्यामुळे कोणत्याही प्रकारे जैविक पर्यावरणाला हानि होणार नाही. |
| समाजिक आर्थिक पर्यावरण | प्रस्तावित रेती उत्खननामुळे रोजगार निर्मिती होईल आणि स्थानिक ग्रामस्थांना प्राधान्य देण्यात येईल. कोणत्याही प्रकारे नकारात्मक किंवा दुष्परिणाम अपेक्षित नाही. |
| कचरा/ओवरबर्डन व्यवस्थापन | कोणत्याही प्रकारचा कचरा किंवा ओवरबर्डन या खाणकामात उत्पन्न होणार नाही. |

## ५ व्यवसाय, आरोग्य व सेवा योजना

- खाण कामगारांना वैयक्तीक संरक्षणात्मक उपकरणे देण्यात येतील जसे की सुरक्षा हेल्मेट, गमबुट आणि कान, नाक, डोळे व हातांच्या सुरक्षेसाठी उपकरणे.
- कामगारांना धूळीपासून बचावासाठी मुखवटा देण्यात येईल.
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि निवारा खाण कामगारांना देण्यात येईल.
- प्रथमोपचार किट खाणकाम क्षेत्रामध्ये उपलब्ध असणार.
- फिरते शौचालय कामगारांसाठी उपलब्ध असणार जेणेकरून सांडपाण्याची व्यवस्था होईल.
- घनकचरासाठी कचरापेटीची व्यवस्था असेल आणि त्याची स्थानिक पातळीवर विल्हेवाट लावण्यात येईल.

## ६ वृक्षारोपण योजना

- मान्सून दरम्यान दि. १० जून ते ३० सप्टेंबर नदी किना—यावर व वाहन मार्गावर झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.
- नीम, पिंपळ, करंज, गुलमोहर अशा स्थानिक झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे.
- स्थानिक प्रजातीचे ५०० रोप प्रती हेक्टर २ मीटरच्या अंतरावर लावणे प्रस्तावित आहे

| | |
|---|---|
| हरित पट्टिका ची जागा | नदीचा काठावर आणि पोहोच रस्त्याच्या दोन्ही बाजू ने |
| वृक्षांची संख्या | ५०० वृक्ष प्रति हेक्टर |
| वृक्ष मधला अंतर | २ मी |
| प्रजाती | स्थानीक प्रजाती |

## ७ प्रकल्पाचे फायदे

- ➢ वैज्ञानिक पध्दतीने केलेल्या रेती उत्खननामुळे पूराचे पाणी नदीच्या पूरमैदानाच्या पलीकडे पसरण्यास प्रतिबंध होतो म्हणजेच लगतच्या शेतजमिनी आणि रस्त्यांवर होणारा दुष्परिणाम कमी होईल.
- ➢ रेती उत्खननामुळे शासनाला रॉयल्टीच्या रूपात महसूल मिळू शकेल.
- ➢ रेती उत्खनन उपक्रमामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल.
- ➢ मागणी आणि पुरवठ्यातील तफावत कमी करण्यासाठी प्रस्तावित भाडेतत्वावरील उत्पादन अत्यंत उपयुक्त आहे.
- ➢ बाजारपेठेत रेती उपलब्ध असल्याने अवैध उत्खननाला आळा बसू शकेल.
- ➢ प्रकल्पामूळे प्रत्येक घाटात किमान १३ — १५ कामगारांना प्रत्यक्ष रूपात रोजगार उपलब्ध होईल

- मान्य निविदाधारक /रेती ठेकेदार सादर पर्यावरण व्यवस्थापन योजना क्रियान्वयनाचा अनुपालन अहवाल जिल्हा खनिकर्म अधिकारी, तत्सम तहसीलदार यांना सादर करेल.
- जिल्हा खनिकर्म अधिकारी तत्सम तहसीलदार हा पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या क्रियान्वयनाची वेळोवेळी तपास करतील व मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीला अहवाल वाळू निर्गमीती च्या धोरण मध्ये सुचविल्याप्रमाणे सादर करतील.